|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## (पूर्वीचे - उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव )

## *परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग*

जा.क्र. - कबचौउमवि/७-क / ५४२३ /२०१९ दि. २०/११/२०१९

प्रति,
**मा. प्राचार्य / प्राचार्या ,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व विज्ञान महाविद्यालये-
यांना --

**विषय :-** माहे ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या व्दितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या अप्राप्त गुणांबाबत --

महोदय / महोदया,

माहे ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०१९ मध्ये व्दितीय वर्ष विज्ञान वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन त्या-त्या संबंधीत महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षा आयोजीत करुन, विद्यार्थ्यांच्या सिलबंद गुणयाद्या (UA) विद्यापीठास सादर केल्या आहेत.

सदर गुणयाद्यांची संगणकात नोंद घेत असतांना, काही विद्यार्थ्यांचे गुण अप्राप्त असल्याचे निर्दशनास आलेले आहे. ज्या विद्यार्थ्यांचे गुण अप्राप्त आहेत अशा विद्यार्थ्यांची संपूर्ण Excel File महाविद्यालयांना e-mail व्दारे पाठविण्यात आलेली आहे. महाविद्यालयाच्या e-mail वर सदर फाईलचे अवलोकन करण्यात येऊन, आप-आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांच्या गुणात त्रुटी असेल, अशा विद्यार्थ्यांच्या गुणांची त्रुटी पुर्तता दि. २५/११/२०१९ पर्यंत आवश्यक त्या नमुन्यात मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीनिशी सिलबंद लिफाफ्यात सादर कराव्यात. तसेच सदरचे विद्यार्थी अनुपस्थित असल्यास किंवा महाविद्यालय / विषय बदल केलेला असल्यास तसा उल्लेख करण्यात यावा. यादीतील विद्यार्थ्यांच्या गुणांतील त्रुटी दिलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्यास, सदर विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेस गैरहजर असल्याचे संबोधण्यात येऊन, निकालाची प्रक्रीया सुरु करण्यात येईल व त्यानंतर त्यात कोणताही बदल केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू

Sd/-

(के. छ. पाटील)
सहायक कुलसचिव,
परीक्षा (विज्ञान व शिक्षणशास्त्र) विभाग.